## महिन्याचा विचार

### सेवेची कार्यक्षेत्रे

कर्मयोगाचे सुप्त प्रवाह ज्ञान किंवा भक्ती योगात अनुभवायला मिळतात. मानवतेच्या सेवेमध्ये कर्मयोगाचे सिंचन आणि विस्तीर्ण क्षेत्रात त्याला येणारी फळे यांचे योगदान महत्वाचे आहे आणि ते सर्वदूर पसरलेले आढळते. गुरूदेवांच्या माध्यमातून ईश्वराच्या असंख्य बालकांना व्याधीमुक्ती, मन:शांती, आणि ऐश्वर्य मिळाले याची असंख्य उदाहरणे पाहायला मिळतात. सेवेच्या कोणत्या घटकावर गुरूदेवांचा अधिक भर होता, हे सांगणे थोडे अवघड नक्कीच आहे. मात्र मनोभावे केल्या गेलेल्या सेवेवर गुरूदेव सर्वाधिक खुश असत हे नक्की. सेवाभावी वृत्ती अधिक महत्वाची असते. तारूण्यापासून त्यांनी आणि त्यांचे भयानक परिणाम जवळून पाहिले होते. त्यामुळे रूग्ण सेवा हा त्यांच्या हृदयातील हळवा कप्पा निश्चितपणे होता. नरसिम्हा अय्यर यांनी मला यातील डॉ. कुप्पस्वामींच्या (गुरूदेव) करूणेच्या असंख्य कहाण्या आम्हाला सांगितल्या आहेत. आजारी व्यक्तीच्या सेवेत घालविलेला काळ हा त्यांच्या मते सर्वोच्च त्याग असायचा. श्रीमंतांना स्वत:च्या प्रकृतीची काळजी घेता येते, वेळ प्रसंगी तज्ञ डॉक्टरांचे उपचार सहजी उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे गुरूदेवांना गरिबांविषयी अधिक कणव असे, कळवळा वाटत असे. गरिबांना आर्थिक अडचणी असतात. सुदैवाने गुरूदेवांना परमात्म्याने खूप काही दिले होत, ज्यायोगे गरिबांना मोफत सेवा तर देतच, पण वरती त्यांच्या आहारासाठी मदत करीत.



गुरूदेवांच्या एका घनिष्ट मित्राने मलायातील आश्रमाला सुमारे पंचवीस वर्षांनी भेट दिल्या वर खालील उद्‌गार काढले होते. ''त्याकाळी स्वामीजींची थोरवी आमच्या ध्यानात आली नाही. आम्ही असं समजून चाललो होतो की ते अनेक विपदांनी घेरलेले असतील.''स्वर्गाश्रमातील वास्तव्यातही ते रूग्ण सेवेला सतत वाहिलेले असत. परमपूज्य स्वामीजी श्री तपोवनजी यांना अजूनही ते दिवस लख्ख आठवतात– गुरूदेव जातील तेथे तीन पिशव्या नेत असत. एकीत छापील साहित्य, एकीत फळे, आणि तिसरीत औषधे! वाटेवरून चालताना ते जागोजागी थांबत. साधू आणि खेडूतांची प्रेमळपणे विचारपूस करीत असले तरी दूकानातून दूध, फळे खरेदी करून त्यांचे वाटप गोरगरिबांना करीत असत. स्वत: स्थापन केलेल्या सत्यसेवाश्रम दवाखान्यात ते रूग्णांवर ''जिवंतदिव्यत्व'' समजून उपचार करीत. जेव्हा ते ऋषिकेशमध्ये स्थिरावले तेव्हा सर्व प्रथम त्यांनी दवाखाना सुरू केला आणि नव्याने रूजू झालेल्या व्यक्तींवा आधी रूग्णसेवेचे प्रशिक्षण दिले. एकदा एका निराधार व्यक्ती राम आश्रमाबाहेर पडलेली त्यांना आढळली. त्या व्यक्तीकडे कोणीही लक्ष देत नव्हते. गुरूदेवांनी मात्र त्या व्यक्तीला त्वरीत आश्रमात आणले आणि सर्व शिष्यांना त्या व्यक्तीच्या सेवेची सक्ती केली. बद्रीकेदारच्या यात्रेहून परतणाऱ्या यात्रेकरूंच्या सेवेसाठी गुरूदेव सदैव सज्ज असत. त्यांच्या थकलेल्या आणि भेगाळलेल्या पायांना मालिश करीत असत आणि इतर आश्रमवासीयांनाही नि:स्वार्थ सेवेचे उदाहरण घालून



देत. म्हणूनच अद्ययावत साधनांनी युक्त असलेले शिवानंद रूग्णालय आणि शिवानंद नेत्रालय आनंद कुटीर परिसरात सुरू होण्यामागे हा सत्संकल्प होता.

Sivananda's Integral Yoga
By Swami Venkatesananda

---

दरवर्षी पुणे शाखेच्या वतीने १४ जुलै रोजी स्वामी शिवानंद सरस्वती स्मृती व्याख्यान आयोजित केले जाते. यंदा दि. १४ जुलै २०२१ रोजी वडोदरा येथील डॉ. जयंत दवे यांचे '' स्वामी शिवानंद सरस्वती – एक विरल व्यक्तित्व'' या विषयावर हिंदीतून व्याख्यान झाले. सुमारे ७६ भाविकांनी या दूरस्थप्रणालीद्वारे झालेल्या व्याख्यानाचा लाभ घेतला. सुरूवातीला पुणे शाखेचे अध्यक्ष – भ.रा.नाईक यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यांचे निधन दि. ३० जून रोजी सांगली येथे झाले.

शाखेच्या कार्याचा थोडक्यात परिचय आणि वक्त्यांचा परिचय श्री.नितीन देशपांडे यांनी करून दिला. व्याख्यानानंतर विश्व प्रार्थनेचे गायन सौ.प्रज्ञा अंजल यांनी केले आणि डॉ. आनंद राव यांनी आभार मानल्यावर कार्यक्रमाची सांगता झाली. संयोजन श्री. प्रणव जेरे यांनी केले.

व्याख्यानातील काही मुद्दे सुत्र रूपाने –

१) ध्यान ही साधना पथावरील प्रमुख पायरी असते. समाधीपलीकडील अवस्था प्राप्त करणे ही गुरूदेवांची अपेक्षा असायची.

२) भगवंताशी अनुसंधानासाठी AWAKE, RISE & ELEVATE या मार्गाने क्रमणा करावी लागते. जगात परमात्म्याचे दर्शन ज्ञानी व्यक्तीला जसे होते, तसेच ते ध्यानी व्यक्तीलाही होते.

३) स्वामी कृष्णानंद सरस्वती म्हणत ''तपस्या का मतलब चेतना को एकाग्र करना! सफलता तभी प्राप्त होगी, जब जीवन मे तपस्या होगी!''

४) स्वामीजी म्हणत DLS is MINI UNIVERSE ! DLS is in the heart of every sadhak

५) स्वामी कृष्णानंद म्हणत DLS चे मूलाधार म्हणजे अ) Concentration of feelings ब) Integrity of purpose (unification) क) Stimuli of will ड) Totality of outcome

६) वेदांती मानता है की जीव/जगत/जगदीश में अनुसंधान होता है। जगत हम से अलग नहीं और जगदीश हमसे उपर नहीं है!

७) जीवन को मेडिकेशनसे मेडिटेशन तक लेकर जाना है।

८) गीता हमें शारीरिक, वाचिक और मानसिक तप सिखती है। हम शारीरिक तप को अहम मानते है, वास्तव में मानसिक सबसे श्रेष्ठ होता है क्योंकी यहाँ मन पर स्वामित्व पाना अधिक मुश्किल होता है।

९) दुनिया को अध्यात्मिक दृष्टी प्रदान करना स्वामी शिवानंदजी का जीवित कार्य था।



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

* जुलै महिन्याचा सत्संग गुरूपौर्णिमेच्या दिवशी दि.२३ ला ऑनलाईन झाला.
* ''दिव्य जीवन'' या आपल्या मासिक पत्रिकेचा जुलै महिन्याचा अंक सदस्यांना हार्ड आणि सॉफ्ट कॉपी रूपात पाठविण्यात आला.
* शिवानंद स्मृती व्याख्यान या मालिकेतील पुष्प यंदा डॉ. जयंत दवे यांनी गुंफले. १४ जुलैच्या कार्यक्रमात त्यांनी '' ''स्वामी शिवानंद सरस्वती - ''एक विरल व्यक्तीत्व'' या विषयावर सुंदर व्याख्यान दिले. स्वामी कृष्णानंद सरस्वती यांच्याबद्दलही अनेक आठवणी सांगितल्या.

## पुणे शाखेचा पत्ता

श्री.नितीन देशपांडे
'ईशावास्य' प्लॉट नं. ४९/सायंतारा, डी.एस.के.
विश्‍व, धायरी, पुणे ४११०६८,
मो.नं. ९८५०९३१४१७

बुक पोस्ट

प्रति





# दिव्य जीवन



वर्ष १६/अंक ८
ऑगस्ट २०२१

Do not think of the body. Think of the birthless, deathless, changeless, decayless Atman or the Eternal soul, the Light of lights, the Sun of suns which is ever shining in the chambers of your heart. Be bold. Be cheerful. Realise this Atman now this every second through purity and meditation and be free from all sorrows and delusion. This Atman is distinct from body and mind.

- Swami Sivananda